Vol. 1, Issue 1 | 1st March, 2019 (Monthly) | **Price:** ₹100/- | **Total Pages:** 36

2 Years onwards

चिकूPiku

Fun & Learning



For Kids & Parents

Brain Based Nurturing for Early Childhood.

Stories & Activities in मराठी and English Languages.

What my kid would learn form Chiku Piku?

चिकू Piku
Page No. 4

Building friendship, helping others.

फिरिरा
Page No. 10

Amazing underwater world, family bonding.

Curious CUBO
Page No. 16

Encouraging curiosity & imagination.

चिमणी चित्र
Page No. 19

How art & drawing can be used in a natural way to help children express themselves better!

छबी आणि बागुलबुवा
Page No. 22

Building self-confidence, overcoming fear.

Nature and मी
Page No. 28

Let the kids interact with the elements of nature around them.

Chiku Piku team of experts: **Dr. Shruti Panse** (Educationist) | **Abha Bhagwat** (Artist- wall art painting)
Dharmaraj Patil (Ornithologist) | An enthusiastic team of illustrators & artists

---

Owned & Published by One Zero Eight Learning Pvt. Ltd. | **Editor** - Dr. Shruti Panse
Printed by Atharva Print Creation, S. No. 91/1, Plot No. 8, Tulshibaugwale Colony, Sahakarnagar, Pune 411 009
Published at Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor, Hingne Kh., Sinhgad Road, Pune 411 051.

प्रिय आई-बाबा,

आपल्या घरात गोड-गोजिरवाणी आणि तितकीच दंगेखोर मुलं आहेत. ती एका जागेवर मुळीच स्वस्थ बसत नाहीत. सारखी नवी खेळणी हवी असतात, पण खेळणी आणली की त्यांच्याशी न खेळता घरातली पातेली, भांडी, चमचे, नाहीतर आई-बाबांच्या मोबाईल-लॅपटॉपशी खेळण्यात जास्त रमतात. साधारणपणे २ ते ६ या वयोगटातल्या मुलांना सतत नव्या गोष्टी हव्या असतात पण यात त्यांची काही चूक नसते. त्यांच्या बुध्दीची भूकच जास्त असते. प्रत्येक नवा अनुभव, नवा खेळ, नवी कविता त्यांच्या मेंदूतल्या न्यूरॉन्सची जोडणी (synapses) करत असते आणि हे काम अत्यंत वेगात होत असतं. म्हणून तर या जिवाला स्वस्थता म्हणून नसते.

अशा सर्व गोष्टी लक्षात घेऊनच 'चिकूपिकू' चा पहिला अंक सादर करत आहोत. हा अंक खास या वयातल्या मुला-मुलींसाठी आणि त्यांच्या मेंदूत भरपूर आणि चांगल्या गोष्टींच्या जोडण्या व्हाव्यात याचसाठी निर्माण केलेला आहे. काळाची गरज लक्षात घेऊन मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांचा वापर केला आहे. मुलांना तुम्ही अंकातल्या गोष्टी वाचून दाखवा. सगळ्या activities त्यांच्याबरोबर वेळात वेळ काढून सोडवा. म्हणजे हळूहळू त्यांच्या मनात गोष्टी, गाणी, activities ची आवड निर्माण होईल. अंकात अनेक ठिकाणी एखाद्या activity मधून मुलांना काय मिळेल, हे सांगितलं आहे. त्याचाही तुम्हाला उपयोग होईल.

आजकाल गुगलवर खूप गोष्टी उपलब्ध आहेत, तरीही प्रिंट मीडियात हा अंक सादर करत आहोत, कारण गुगल, यू ट्यूबवर मुलं रमतात खरी, पण या वयात त्यांना स्क्रीनपासून लांब ठेवणं अत्यावश्यक आहे. त्यांच्या कल्पनाशक्तीला, विचारक्षमतेला संधी देणं हे आजकाल जास्त महत्वाचं आहे.

या अंकाची संपूर्ण मांडणी मुलं आणि आईबाबा यांचा विचार करूनच केलेली आहे. मुलांना पेस्टल कलर्स, स्केचपेन, वॉटर कलर सुध्दा वापरू द्या. खडू, कोळशाचा तुकडा याने सुध्दा रंगवायचं असेल तर रंगवू द्या. त्यासाठीच अंकाचा कागद जाणीवपूर्वक निवडलेला आहे. हे सर्व करताना अंक चुरगळला, फाटला, ओला झाला तर रागवू नका. अंक मनमुराद पध्दतीने 'वापरला' गेला आहे, याचीच तर ती खूण आहे.

मुलांबरोबर तुम्हीही लहान व्हायची मजा घ्या! गोष्टी वाचा, ठिपके जोडा, चित्रं रंगवा. आणि हो! डोकं लढवल्यासारखं करा, पण विचार मुलांना करू द्या. अंकाच्या संदर्भातले तुमचे अनुभव, सूचना आम्हाला कळवल्या तर छानच!



डॉ. श्रुती पानसे
Ph.D. (Brain-based Learning)
Educationist | Consultant | Child Psychologist
www.shrutipanse.com


निकू Piku
खूप खूप भूक लागलीय... आणि तहान पण...
अरे, हे कुत्र्याचं पिल्लू का रडतंय? त्याला भूक लागलीय वाटतं... त्याची आई पण दिसत नाहीये जवळपास...
कू....कू...कोणी आहे का इथे...? निकू, तू तरी बाहेर ये की गं... या कुत्र्याला मदत करा कोणी तरी... कू...कू....कू...



चिकू पिकूला भेटूयात पुढील अंकात..

Parents Zone

Narrate the story to the kid
Core thought: Helping others

Bholu Turtle Wants to Fly!



Tell him which object can make him fly.





Identify the twins!

Two of the cats / kittens are identical. Connect them with a line.






Parents Zone

These activities would help to develop your kid's observation and correlating abilities.


Colour Trace and Connect

Tell the name of each shape.
Connect the dots to complete the shape.





Rhyme time

Say these words loudly.
Do they rhyme? If yes, tick ✓




Match The Shadows






Who among the following doesn't live in the water?

Circle It



Octopus



Crab



Sea horse



Owl

Parents Zone

These activities could help to develop hand-eye co-ordination



Circle the name of the cities starting with 'K'

तुझ्या शहराचं नाव लिही बरं!

....


Parents Zone

Ask your kid to say the name of each city loudly. This is a phonic activity.

फिशिरा

फिशिरा नावाची मासोळी खोल समुद्रात राहते.
एके दिवशी ती मित्र-मैत्रिणींबरोबर लपा-छपी खेळत असते.





हे बघा.
या समुद्र वेलींच्या
जाळ्यात, या दगडाच्या
खाली आपली घरं आहेत.
आता लक्षात ठेवायचं
आपलं घर आणि
लांब जायचं नाही!

मी आता नक्कीच
घर लक्षात ठेवीन.

Parents Zone

Explain the child some easy to remember landmarks near your home.

फिशिराला भेटूयात
पुढील अंकात..

SPOT SPOT



Ask your little one to spot


1) An Owl
2) A Rhino
3) A Monkey
4) A Smiling Crocodile
5) A Blue & Red Coloured Bird
6) A Hippo & an Elephant.

Name:..

Age:............................ School:..............................

रंगवलेल्या चित्राचा फोटो आम्हाला **whatsapp** वर पाठवा.

91721 36478



चित्र रंगवा, चिकूला सजवा.

Parents Zone

Developmental Perks: Colouring helps to build muscle endurance.

Do you like these decorated numbers?





Write down your birth date.
Now decorate it as you wish.

Parents Zone

Ask your kid her/his birth date. Tell her/him if she/he doesn't know.
Write down the date & ask your kid to colour & decorate it.



असं का होत असेल?

कैरीचा रंग आधी हिरवा मग पिवळा का होतो?

विचार कर. उत्तर शोध.



Parents Zone

मुलांना हा प्रश्न विचारा, थोडा विचार करू द्या. नंतर खाली दिलेले उत्तर समजावून सांगा.

कैरीच्या सालीत अनेक रंग लपलेले असतात. हिरव्या रंगाच्या क्लोरोफिलमुळे ती आधी हिरवी दिसत असते. ती जसजशी पिकते, तसतसं त्यातलं पिवळा रंग आणि काही दिवसांनी केशरी रंग आपल्याला दिसायला लागतात.

Curious CUBO

Cubo is a smart boy, his world is full of curiosity & imagination.










Parents Zone


Questions may play an important role in cognitive development of kids. We should answer his/her questions positively without getting annoyed.


TINGU MINGU AND CHEESE











Tingu




Cheese



Mingu


One day  found a large piece of 


His mother said,  share the piece of 



with your friend .

 ate the whole piece of  all alone.

In the evening  had a bad stomach ache.

Holding his stomach  said, I should

not have eaten so much of .

I should have shared the  with .

चिमणी चित्र

-आभा भागवत

आवर्जून काय कराल

मुलांना चित्र काढण्यासाठी भरपूर, वैविध्यपूर्ण साहित्य उपलब्ध करून द्या. हीच त्यांच्या भविष्यातील कल्पकतेची बीजं असतील.

काय करू नका

मुलांच्या चित्रांना घाण म्हणू नका, त्यांना हसू नका.




पालकांसाठी

मुलं नऊ दहा महिन्यांची असल्यापासूनच चित्र काढू शकतात हे आपल्याला माहित नसतं. तोंडात रंग साहित्य घालतील या भीतीमुळे आपण मुलांना खूप लहान वयात रंग देणं नाकारतो. पण त्यामुळे मुलांच्या अभिव्यक्तीचं एक दार बंद होऊ शकतं. तसं होऊ नये यासाठी पालकांनी आवर्जून काही प्रयत्न करायला हवेत.

- जसं खायचे रंग (फूड कलर्स) मुलांना देणं, भाज्यांपासून रंग करून ते वापरणं.
- मुलं चित्र काढताना आपणही त्यांच्याबरोबर चित्र काढणं, ज्यामुळे खडू किंवा इतर ओले रंग तोंडात घालायचे नाहीत, तर त्याने रंगकाम करायचं आहे हे मुलांना पक्कं लक्षात येईल.
- हे करताना मुलांना अजिबात रागवायचं नाही. कारण रागावण्याशी ज्या गोष्टीचा संबंध मुलं जोडतात, ती गोष्ट त्यांना करावीशी वाटत नाही.
- जे साहित्य उपलब्ध आहे त्यातून चित्र काढणं महत्वाचं आहे. अगदी मातीत पाणी घालून सुध्दा रंग तयार करता येतो.

हाताची बाह्यरेखा काढून त्यातून पालकांनीही चित्र काढून बघा. प्रत्येकाचं चित्र वेगळं होतं. प्रत्यक्ष हाताचा ठसा त्याहूनही वेगळा येतो. मुलांच्या हाताचे छोटे ठसे आणि पालकांच्या हाताचे मोठे ठसे, असं एकत्र चित्रही तयार करून पहा.





मुलांसोबत ही Activity करून पहा!

साहित्य - कोरे कागद, पेन्सिल आणि रंग

काय करायचं - तुझा हात कागदावर कुठेही ठेवून हाताच्या बाहेरून पेन्सिलने फिरव. हाताचं चित्र तयार होईल. मग कागद हवा तसा फिरवून त्यातून एखादा प्राणी, पक्षी किंवा इतर काही चित्र काढ. ओले रंग घेऊन ते हाताला लावून त्याचा ठसा घे. त्यातूनही वेगळे आकार शोध आणि स्केच पेन किंवा रंग वापरून चित्र तयार कर.



हाताच्या ठशांनी बनवलेले चित्रांचे काही नमुने





शेजारी दिलेली Activity या पानावर करा.

छबी आणि बागुलबुवा

बागुलबुवा म्हणल्यावर भीती वाटते, पण आमचा बागुलबुवा अजिबात तसा नाही. मुलांना नक्कीच तो आवडेल.



Parents Zone

असं करू नकोस बुवा येईल, असं सांगून आपण मुलांना शांत तर बसवतो पण त्यानं आपणच मुलांच्या मनातली भीतीची जागा मोठी करतो.


छबीऽऽऽ खा हं... नाहीतर बागुलबुवा येईल बघ पकडायला!
बागुलबुवा? नक्की कोण आहे हा बागुलबुवा?



बापरे!!!
खरंच बागुलबुवा
असेल तर?!


अगं वेडाबाई,
काय विचार करत बसलीस?
चल मंडईत जाऊन येऊ.

वाटेत त्यांना आजीच्या ओळखीचे काका भेटले.



Let's Match!



a- ___ b- ___ c- ___ d- ___




Tongue Twisters


Red Lorry, Yellow Lorry,
Red Lorry, Yellow Lorry

कच्चा पापड
पक्का पापड

Join the numbers and colour the picture




Easy way to draw a MOUSE



Try it out

Bittu Bird

wants to go home. Complete the alphabets and help her.



Nature and मी

Dharamaraj Patil
(Ornithologist)





हे कोणत्या पक्ष्याचे पाय आहेत?
बघ! त्याच्या बोटांमध्ये
त्वचेचा पडदा आहे?
का बरं?

पाण्यात पोहता यावं म्हणून.

तुझ्या पायांना किती
बोटं आहेत? ________

Colour It








वाघाच्या पावलाचा ठसा बघ!
त्याच्या पायाला अंगठा नाही.
चारच बोटं आहेत आणि तळहात
गादीसारखा मऊ आहे. का बरंऽऽऽ?

शिकार करताना धावून प्राणी पकडण्यासाठी.



Colour It
I don't need legs as I crawl
DO YOU KNOW?
Which animals have zero legs (No legs)
I don't need legs. Because I crawl
I have fins instead of legs. I swim all the time.

My Favourites

Parents Zone

Ask these questions to kid. You have to note down all his/her favourite things.



My pet name: ....

My birth date: ....






I like to eat: ....

My favourite color: ....






My favourite animal: ....

Look at these flowers which one among them is the largest one? Colour it. Now circle the smallest one.





Parents Zone

Concept of size : Make kids learn the differences between various sizes



मी इथे चिकूचं चित्र काढलंय.

He is my best friend.




Parents Zone

Ask kid to name the animal.
You have to write down that name.

इथे तुझ्या आवडत्या प्राण्याचं चित्र काढ. त्याला एखादं नाव सुचव आणि चित्राखाली त्याचं नाव लिही.

चित्र रंगव आणि
चित्राखाली त्याचे नाव लिही.






ब शोधून त्याखाली रेष मार.



बॉल



कोंबडी




बकरी


ब



बाटली




कोबी



आंबा




बाग



Parents Zone

'ब' दाखवा. 'ब' अक्षराखाली तुम्ही रेष मारा.
चित्र मुलांना ओळखू द्या व तुम्ही नाव लिहा.

या चित्रात D शोध आणि त्यावर गोल कर.





D			
d			

Colour the pictures starting with the alphabet "A".



My Corner









निर्ऋती जोशी

निर्ऋती ही नाशिक येथील आनंद निकेतन या प्रयोगशील शाळेत इयत्ता दुसरीत शिकते. ती वयाच्या अडीचव्या वर्षापासून चित्र काढायला लागली. घरातल्या भिंतीवर ती मनमोकळं चित्र काढते.

तिच्या प्रत्येक चित्रात एक गोष्ट असते. गोष्ट आधी तिच्या डोक्यात तयार होते नंतर कागदावर उतरते. आत्तापर्यंतची तिची बहुतांश चित्र तिच्या स्वभावाप्रमाणेच मिश्किल आहेत.

1st March, 2019 (Monthly) | Price: ₹100/-
RNI TC No. MAHBIL10083

What's wrong, in this image? Tell your mother.

